बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक - ६५ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540


दैनिक गुरुवार १६ जानेवारी २०२६

# बातमी जगत

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

TRENDING NEWS

अमीषा पटेलच्या नावे बनावट नंबर प्रसारित:अभिनेत्रीने सोशल मीडियावर चाहत्यांना सतर्क केले, स्क्रीनशॉट शेअर करत म्हणाली- ही मी नाहीये



## थोडक्यात

### वृद्धाला मारहाण

**यवतमाळ :** मुलाने पार्टी न दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून शेजाऱ्याने एका ६० वर्षीय वृद्धाला काठीने मारहाण केली. ही घटना भोयर येथे घडली. फिर्यादी बारकोजी रामदास लुंगसे हे आपल्या अंगणात बसले असताना आरोपी शुभम ओंकार सहारे याने दारूच्या नशेत येऊन वाद घातला. 'तुझा मुलगा पार्टी देणार होता, पण त्याने दुसऱ्याला दिली' असे म्हणत शुभमने बारकोजी यांच्या हातावर काठीने मारून जखमी केले. याप्रकरणी यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### धक्का लागल्याने यात्रेत राडा

**पुसद :** चालताना धक्का लागल्याच्या कारणावरून चार जणांनी मिळून एकाला दगडाने बेदम मारहाण केली. ही घटना लाखी (ता. पुसद) येथील यात्रेत १ जानेवारी रोजी घडली. फिर्यादी भाऊराव प्रकाश राठोड (३०) यांचा आरोपी सचिन राठोड याला धक्का लागला. यावरून सचिन राठोड, नितीन राठोड, शामराव जाधव आणि सचिन जाधव यांनी भाऊरावला शिवीगाळ करत दगडाने डोळ्यावर आणि हातावर मारून जखमी केले. पुसद ग्रामीण पोलिसांनी चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

### व्हेंटिलेटर तोडून चोरीचा प्रयत्न

**आर्णी :** घरातील व्हेंटिलेटरच्या काचा आणि जाळी तोडून घरात घुसून चोरीचा प्रयत्न केल्याची घटना लोणी येथे घडली. याप्रकरणी प्रतिभा वामन गायधने (४८) यांनी तक्रार दिली आहे. आरोपी लखन प्रमोद रामटेके (२२, रा. लोणी) याने ४ जानेवारीच्या सकाळी हा प्रयत्न केला. चोरीच्या उद्देशाने घरात प्रवेश करण्याच्या प्रयत्नात असतानाच हा प्रकार उघडकीस आला. आर्णी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### दुचाकी चोरी

**आर्णी :** म्हसोला ते पांगरी रोडवरून ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली. फिर्यादी मयूर विनोद केराम (२५, रा. पांगरी) यांची एमएच २९ एझेड २३१० क्रमांकाची गाडी १० डिसेंबर रोजी चोरीला गेली होती. याप्रकरणी सचिन संदीप सुकळकर (३२, रा. लाख रायजी, ता. दिग्रस) याच्याविरुद्ध आर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### १९ हजारांचा मोबाईल लंपास

**आर्णी :** बाबा कंबल पोष दर्गा परिसरात खुर्चीवर ठेवलेला १९ हजार रुपयांचा मोबाईल चोरट्याने पळवून नेला. ही घटना २५ डिसेंबर रोजी घडली. फिर्यादी शेख सलीम शेख रहीम (३७, रा. मालखेड) हे दर्शनासाठी आले होते. त्यांनी आपला विवो कंपनीचा मोबाईल खुर्चीवर ठेवला असता तो चोरीला गेला. याप्रकरणी आर्णी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# ठाकरे बंधू म्हणजे विकासाचे स्पीडब्रेकर

## मतदानासोबतच राजकीय युद्ध पेटलं; शेलार-साटमांचा हल्ला, मतदानानंतर भाजप नेत्यांची टीका

बातमी जगत | प्रतिनिधी



**मुंबई :** महानगरपालिकेसह राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज सकाळी 7.30 वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली असून, पहाटेपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांची गर्दी पाहायला मिळत आहे. मुंबईत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, मतदानाच्या पहिल्याच काही तासांत आरोप-प्रत्यारोपांची धार अधिक तीव्र झाली आहे. भाजपचे मुंबईतील प्रमुख नेते आशिष शेलार, अमित साटम आणि शायना एन सी यांनी सकाळी लवकर मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर या नेत्यांनी माध्यमांशी संवाद साधत विरोधकांवर, विशेषतः ठाकरे बंधूंवर थेट टीका केली.

मतदानानंतर पत्रकारांशी बोलताना भाजप नेते आशिष शेलार यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार हल्ला चढवला. ठाकरे बंधू हे अकार्यक्षम असून ते मुंबईच्या विकासातील 'स्पीडब्रेकर' असल्याचा घणाघाती आरोप त्यांनी केला. आम्ही मराठीच आहोत आणि मुंबईकर आमच्यासोबत आहेत. ही निवडणूक म्हणजे परिवर्तनाची नांदी आहे. भ्रष्ट आणि अकार्यक्षम ठाकरे बंधूंना धडा शिकवण्याची वेळ आली आहे, असे शेलार म्हणाले. मुंबईकरांनी विकासाच्या बाजूने मतदान करावे, असे आवाहन करत त्यांनी भाजपच्या विजयाबाबत ठाम विश्वास व्यक्त केला. आशिष शेलार यांनी पुढे ठाकरे बंधूंवर टीका करताना राजकीय उपरोधही केला. आम्ही ठाकरे बंधूंना बुद्धीबळाच्या पटावर चितपट करू. मुंबईचं ठरलं आहे की गतिरोध निर्माण करणाऱ्या ठाकरे बंधूंना विरोध करायचा, असे ते म्हणाले. राज ठाकरे यांनी 2014 साली अशाच प्रकारचे आवाहन केले होते, मात्र त्यावेळी त्यांच्या हाती काहीच लागले नव्हते, असा टोमणाही त्यांनी मारला. तसेच, राज ठाकरे यांना पराभव अटळ असल्याची जाणीव आहे, म्हणूनच ते आता 'पाडू मशीन'सारखे तकलादू मुद्दे उपस्थित करत असल्याचा आरोपही शेलार यांनी केला. दरम्यान, मुंबई भाजपचे प्रदेशाध्यक्ष अमित साटम यांनीही मतदानानंतर ठाकरे बंधूंवर निशाणा साधला. आज मुंबईकर विकसित मुंबईसाठी मतदान करतील. भाजपसमोर आव्हान उभं करणारे ठाकरे बंधू हे विकासाच्या आड येणारे आहेत, असे साटम म्हणाले. त्यांनी ठाकरे बंधूंच्या धार्मिक भेटीवरही टीका केली. काल ठाकरे बंधू मुंबादेवीच्या दर्शनाला गेले होते. मात्र, कोरोना काळात हेच मंदिर बंद ठेवण्यात आले होते, असा आरोप करत त्यांनी ठाकरे बंधूंच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अमित साटम यांनी राज ठाकरे यांच्या पाडू मशीनवरील भूमिकेवरही टीका केली. राज ठाकरे पाडू मशीनबद्दल बोलत आहेत, याचा अर्थ निवडणुकीत पराभव झाल्यानंतर काय बोलायचं, याचीच ते आतापासून तयारी करत आहेत, असा घणाघात त्यांनी केला. भाजप पक्षश्रेष्ठी, मुख्यमंत्री आणि संपूर्ण नेतृत्वाचा पाठिंबा आपल्यासोबत असल्याचे सांगत, या निवडणुकीत विजय निश्चित असल्याचा दावा साटम यांनी केला. भाजपच्या नेत्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे मतदानाच्या दिवशीच राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे चित्र आहे.

### पत्रकारांना आत जाण्यास मनाई

● **दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीदरम्यान राज्य निवडणूक आयोगाच्या एका निर्णयामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. मुंबईत मतदान केंद्रांच्या आत माध्यम प्रतिनिधींना प्रवेश नाकारण्यात आला असून, अधिकृत प्रवेशिका असतानाही पत्रकारांना आत जाण्यास मनाई करण्यात आल्याचे समोर आले आहे. निवडणूक आयोगाने केवळ मतदान केंद्राबाहेरील रांगेचे चित्रीकरण करण्यास परवानगी दिली आहे. या निर्णयामुळे माध्यम प्रतिनिधींमध्ये नाराजी व्यक्त होत असून, निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर अनेक सवाल उपस्थित केले जात आहेत.**

# कोल्हापुरात मतदानाच्या तोंडावर अघोरी प्रकार: परिसरात खळबळ

बातमी जगत | प्रतिनिधी

**कोल्हापूर :** राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाची रणधुमाळी शिगेला पोहोचली असतानाच, कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख रविकिरण इंगवले यांच्या विरोधात राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड येथे 'भानामती' सारखा धक्कादायक आणि गंभीर प्रकार घडल्याचे उघडकीस आले आहे. मतदानाच्या अवघ्या एक दिवस आधी हा संतापजनक प्रकार समोर आल्याने संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, राजकीय तसेच सामाजिक वर्तुळात या घटनेचे तीव्र पडसाद उमटत आहेत. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत घडलेल्या या प्रकारामुळे कोल्हापूरमधील वातावरण अधिकच तापले आहे.

गेल्या तीन-चार वर्षांपासून कोल्हापूर शहरातील स्थानिक नागरी समस्या, सामाजिक प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांवर सातत्याने आंदोलने करणारे रविकिरण इंगवले यांनी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या नेत्यांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला होता. प्रचारसभांमधून त्यांनी सत्ताधारी नेत्यांवर भ्रष्टाचार, गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि घराणेशाहीचे गंभीर आरोप करत जोरदार हल्ला चढवला. विशेषतः बलभीम बँक घोटाळा आणि आमदाराच्या पुत्राला दिलेली उमेदवारी यांसारख्या संवेदनशील मुद्द्यांवरून त्यांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केल्याने निवडणुकीच्या मैदानात मोठी चर्चा रंगली होती.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या विविध प्रभागांतील रस्ते, पाणीपुरवठा आणि ड्रेनेज यांसारख्या मूलभूत नागरी प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत रविकिरण इंगवले यांनी सामान्य जनतेमध्ये पक्षाची पकड अधिक मजबूत केली आहे. पक्षाच्या वचननामा प्रकाशन सोहळ्यात सक्रिय सहभाग घेत त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाची भूमिका मांडली होती. विशेषतः निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध त्यांनी केलेले राजकीय आरोप अधिक तीव्र आणि टोकदार झाल्याने, मतदानाच्या तोंडावर त्यांनी सत्ताधाऱ्यांची मोठी कोंडी केल्याचे पाहायला मिळाले.

# भाजपकडून दहिसरमध्ये 'मिक्सर' वाटप!: काँग्रेसने जाब विचारताच पोलिसांनी घेतले ताब्यात

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास उरले असताना दहिसरच्या शांतीनगर जनकल्याण (वॉर्ड क्र. 3) परिसरात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. भाजप कार्यकर्त्यांकडून मतदारांना छुप्या पद्धतीने 'मिक्सर' वाटप केले जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला असून, या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनाच पोलिसांनी ताब्यात घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शांतीनगर जनकल्याण भागात भाजपच्या कार्यकर्त्यांकडून नागरिकांना प्रलोभन म्हणून मिक्सरचे वाटप केले जात असल्याची माहिती काँग्रेस कार्यकर्त्यांना मिळाली होती. या कथित प्रकाराचा पर्दाफाश करण्यासाठी काँग्रेसचे उमेदवार प्रदीप चौबे, मुंबई युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष अखिलेश यादव आणि मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस विकास पांडे हे आपल्या समर्थकांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या वाटपावर आक्षेप घेत जाब विचारण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच दहिसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, आचारसंहिता भंगाचा आरोप असलेल्यांवर कारवाई करण्याऐवजी पोलिसांनी काँग्रेसचे उमेदवार प्रदीप चौबे, अखिलेश यादव आणि विकास पांडे यांनाच ताब्यात घेतले. पोलिसांच्या या भूमिकेमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे. अखिलेश यादव यांनी भाजप आणि पोलिस प्रशासनावर सडकून टीका केली. ते म्हणाले, भाजपचे पितळ उघडे पडल्यामुळेच सत्तेचा गैरवापर करून काँग्रेस कार्यकर्त्यांचा पोलिसांकडून छळ केला जात आहे. 'चोर सोडून संन्यासाला फाशी' देण्यासारखी कृती असल्याचे त्यांनी म्हटले. भाजपकडून अशा प्रकारे सत्तेचा गैरवापर करून लोकशाहीची हत्या केली जात असल्याची घणाघाती टीकाही यादव यांनी यावेळी केली.

# पुण्यात चक्क माजी मंत्र्यांकडूनच पैसे वाटप!:काँग्रेस नेते प्रशांत जगतापांचा बाळासाहेब शिवरकरांवर गंभीर आरोप, व्हिडिओ व्हायरल

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** महापालिका निवडणुकीच्या आदल्या दिवशी अनेक ठिकाणी पैसे वाटप करण्यात आल्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. आता असाच प्रकार पुण्याच्या वानवडी साळुंके विहार प्रभागात झाल्याचे समोर आले आहे. माजी मंत्र्यांनीच पैसे वाटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या संदर्भात काँग्रेसचे नेते प्रशांत जगताप यांनी याबाबतची माहिती दिली आहे.



प्रशांत जगताप यांनी सांगितले की, आज दुपारपासून भाजपच्या दादागिरीला आणि पैसे वाटण्याच्या प्रकाराला उत आलेला आहे. खूप जोरदार पैसे वाटण्याचा प्रकार सुरू आहे. कुठलाही विकास प्रकल्प नसल्याने पैसे वाटण्याशिवाय पर्याय नाही. भाजपमध्ये गेलेले माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर यांनी आज दुपारपासून पैसे वाटत आहेत, असा दावा जगताप यांनी केला आहे. पुढे बोलताना प्रशांत जगताप म्हणाले, बाळासाहेब शिवरकर यांनी त्यांच्या मुलाच्या प्रचारात पैसे वाटले आहेत. त्यांचे चिरंजीव अभिजीत शिवरकर हे माझ्या विरोधात निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या उमेदवारांसाठी बाळासाहेब शिवरकर हे स्वतः पैसे वाटत आहेत. आमच्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पकडले आणि आझाद नगर पोलिस ठाण्यात नेले आहे. त्यांना त्यांच्या गाडीसाह पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. त्यांची आता चौकशी सुरू आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची देखील आम्ही मागणी केली आहे. तसेच राज्य निवडणूक आयोगाने देखील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जगताप यांनी केली आहे.

# माझा महायुती किंवा मविआला पाठिंबा नाही: मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना सहकार्य करू नका

बातमी जगत | प्रतिनिधी

**जालना :** मुंबईसह राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होत असतानाच, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करत कोणत्याही राजकीय आघाडीला पाठिंबा दिला नसल्याचे जाहीर केले आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी महाविकास आघाडी किंवा महायुती यांपैकी कोणाचीही बाजू घेतलेली नाही, असे स्पष्ट करत त्यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, माझ्या नावाने कोणी पाठिंब्याचे पत्रक प्रसिद्ध करत असेल, तर त्यावर समाजाने विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत त्यांनी मतदानाच्या तोंडावर होणाऱ्या अफवांना पूर्णविराम दिला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, माझा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात होत असलेल्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा कुणालाही पाठिंबा नाही. माझे जूने व्हिडिओ कोणी व्हायरल करत असतील तर ते चूकीचे आहे. माझ्या नावाने कुणी पत्रके प्रसिद्ध करत असतील तर त्यावर कुणीही विश्वास ठेवू नये. जर कुणी स्थानिक पातळीवर पिठींबा दिला असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत विषय असेल त्याचा आमच्याशी कोणताही संबंध नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणारे ते जर कोणी उभे असतील त्यांना मात्र मराठा समाजाने सहकार्य करू नये, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. ते लोक मराठा समाजाच्या लेकरांच्या मुळावर उठलेले आहेत, ते लक्षात घ्यावे. मुंबईसह, महाराष्ट्रात कोणाला पाठिंबा दिलेला नाही, हे लक्षात घ्यावे. महायुती किंवा महाविकास आघाडीला पाठिंबा दिलेला नाही. मुंबई असो की महाराष्ट्रातील इतर महापालिका निवडणुकीत कोणाला पाठिंबा दिलेला नाही. चळवळीत असणाऱ्या पोरांवर सर्वांनी लक्ष ठेवले पाहिजे, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

# कर्तव्यदक्ष प्रशासनाचा सन्मान : सहायक आयुक्त गजानन घिरके यांचा जिजाऊ सृष्टी येथे गौरव...

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ जाकीर खान




**चिखली :** कोरोना महामारीच्या कठीण काळात निर्भीड निर्णय, प्रभावी अंमलबजावणी आणि जनहिताला प्राधान्य देणाऱ्या प्रशासनामुळे जनतेचा विश्वास संपादन करणारे सहायक आयुक्त (औषधे) गजानन प्रल्हाद घिरके यांचा मराठा सेवा संघाच्या वतीने जिजाऊ सृष्टी, सिंदखेड राजा येथे विशेष सन्मान करण्यात आला. राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हा गौरव सोहळा पार पडला. कोरोना संकटाच्या काळात औषधांचा तुटवडा, साठेबाजी आणि बनावट औषधांचा धोका लक्षात घेता घिरके यांनी कठोर नियंत्रण ठेवत प्रभावी कारवाई केली. औषधे, सॅनिटायझर व मास्क यांचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी त्यांनी यंत्रणेला गतिमान केले. कोणत्याही दबावाला बळी न पडता त्यांनी जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने निर्णय घेतल्यामुळे त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय ठरले. समन्वयातून सक्षम प्रशासन आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून त्यांनी जबाबदारीने काम केले. त्यामुळे गजानन घिरके यांची ओळख केवळ अधिकारी म्हणून न राहता लोकहितासाठी कार्य करणाऱ्या विश्वासार्ह प्रशासक म्हणून निर्माण झाली आहे. समाजभान जपणारे नेतृत्व प्रशासकीय कामकाजासोबतच घिरके यांची सामाजिक बांधिलकीही तितकीच ठळक आहे. विपश्यना ध्यानसाधनेमुळे आत्मसंयम, सकारात्मक दृष्टिकोन आणि शिस्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रतिबिंबित होते. विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, नैतिक मूल्यांची जोपासना तसेच समाजप्रबोधनाचे कार्य ते सातत्याने करीत आहेत. त्यामुळे ते तरुणांसाठी आदर्श ठरत आहेत. मराठा सेवा संघाचा गौरव या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित जिजाऊ जयंती सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सत्कार मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम खेडेकर आणि डॉ. रेखाताई खेडेकर (माजी आमदार, चिखली) यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी गजानन घिरके यांचे कार्य कर्तव्यनिष्ठ, समाजाभिमुख आणि प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. सत्कार स्वीकारताना गजानन घिरके यांनी सांगितले की, डॉ. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर खोल प्रभाव आहे. विपश्यना ध्यानामुळे तणावमुक्त व सकारात्मक कार्यशैली विकसित झाल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येकाने आयुष्यात किमान एकदा तरी विपश्यना शिबिराचा अनुभव घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घोगरे, जिजाऊ सृष्टीचे अध्यक्ष मधुकरराव मेहेकर, प्रदेश कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष मनोज आखरे, जिजाऊ ब्रिगेडच्या सीमाताई बोके, राज्य संघटक मनोहर तपुकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शोधक्यात



## जि. प. उच्च प्राथमिक शाळा, राजुरा राव येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल संपन्न

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **सैय्यद इमरान**

**मालेगांव :** मालेगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, राजुरा राव येथील विद्यार्थ्यांची दोन दिवसीय शैक्षणिक सहल दिनांक १० व ११ जानेवारी रोजी विविध ऐतिहासिक, भौगोलिक व तीर्थक्षेत्र स्थळांना यशस्वीपणे पार पडली. या शैक्षणिक सहलीत शाळेतील एकूण ४४ विद्यार्थी व पाच शिक्षक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी संबंधित स्थळांची प्रत्यक्षदर्शी माहिती मिळावी, त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी तसेच मिळालेले ज्ञान पुढील आयुष्यात उपयोगी पडावे, हा या सहलीचा मुख्य उद्देश होता. सहलीदरम्यान देवगड, नेवासा, शनिशिंगणापूर, सोनई येथील रेणुका माता मंदिर, भद्रा मारुती, वेरूळ लेणी, घृष्णेश्वर मंदिर, दौलताबाद किल्ला तसेच सिद्धार्थ गार्डन आदी स्थळांना भेट देण्यात आली. या ठिकाणांच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सहलीचा समारोप १२ जानेवारी रोजी सकाळी राष्ट्रमाता, राजमाता माँ जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी नतमस्तक होऊन मानाचा मुजरा अर्पण करत करण्यात आला. या शैक्षणिक सहलीचे आयोजन मुख्याध्यापक संभाजी साळसुंदर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी शिक्षक महादेव ठाकरे, संजीव डिघोळे, छाया डिघोळे, गणेश धोंगडे, अमोल उगले, प्रदीप पडवाल आदी शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## मुख्याध्यापकाकडून अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकानेच अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. गुरु-शिष्याच्या पवित्र नात्याला तडा देणाऱ्या या पाशवी कृत्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, या घटनेने शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडवून दिली आहे. ज्ञानाचे मंदिर मानल्या जाणाऱ्या शाळेतच घडलेल्या या संतापजनक प्रकारामुळे पालक वर्गात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पीडित मुलगी आणि तिच्या आईने पोलिस अधीक्षक योगेश कुमार यांची भेट घेतल्यानंतर महिला सहाय्य कक्षात त्यांचा सविस्तर जबाब नोंदवण्यात आला आहे.

## वाढदिवस अभिष्टचिंतन...!

# लेखणी आणि शस्त्रक्रियेचा 'आगाझ': माणुसकीचा मसिहा - डॉ. गणेश गायकवाड

**जगाच्या पाठीवर अशी फार कमी माणसे असतात ज्यांच्या एका हातात रुग्णाला जीवनदान देणारा 'स्कॅल्पेल' असतो आणि दुसऱ्या हातात काळजाचा ठाव घेणारी 'शायरीची लेखणी'. बुलढाणा जिल्ह्याच्या मातीतील असेच एक रत्न म्हणजे माझे थोरले आदर्श बंधू आणि मार्गदर्शक डॉ. गणेश गायकवाड, ज्यांना साहित्य जगतात आपण सर्व 'आगाझ बुलढाणवी' म्हणून ओळखतो. आज त्यांचा वाढदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या या विलक्षण प्रवासाचा घेतलेला हा धांडोळा.**



संघर्ष, त्याग आणि कौटुंबिक भक्कम आधारवड आमच्या कुटुंबाचा आजचा हा वटवृक्ष चार दशकांच्या प्रदीर्घ संघर्षातून उभा राहिला आहे. आईचा ४० वर्षांचा तो काळजाला पीळ पाडणारा संघर्ष, तिने घेतलेले कष्ट आणि आम्हाला घडवण्यासाठी दिलेला त्याग हा आमच्या आयुष्याचा पाया आहे. आईच्या त्या कष्टाचे चीज दादांनी आपल्या कर्तृत्वाने केले. या प्रवासात वहिनी सौ. प्रतिभाताईंची साथ मोलाची ठरली. संसाराची आणि हॉस्पिटलची धुरा सांभाळत त्यांनी दादांच्या साहित्यिक छंदाला जो जपले, त्यामुळेच 'आगाझ' नावाचा शायर जगासमोर येऊ शकला. एक मोठा भाऊ म्हणून दादांनी मला कधीही भावासारखे वागवले नाही, तर स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम दिले, जपले आणि मार्ग दाखवला. आज जेव्हा आमची पुतणी डॉ. ऋतुजा हिने पुण्यातील नामांकित मेडिकल कॉलेजमधून MD (Skin) मध्ये 'टॉपर' येण्याचा बहुमान पटकावला, तेव्हा दादांच्या डोळ्यांत जो अभिमान दिसला, तीच आमच्या कुटुंबासाठी खऱ्या अर्थाने कष्टाची फलश्रुती होती. एक निष्णात सर्जन म्हणून दादांनी हजारो रुग्णांचे प्राण वाचवले आहेत. विशेषतः गोरगरीब, अनाथ आणि गरजू लोकांसाठी त्यांचा मदतीचा हात नेहमीच पुढे असतो, तो ही कोणताही गाजावाजा न करता. 'उजव्या हाताने दिलेली मदत डाव्या हाताला कळू नये' या वृत्तीने त्यांनी अनेक लेकी-बाळींच्या लग्नासाठी आर्थिक मदत, त्याचबरोबर देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या कुटुंबातील व्यक्तीच्या ऑपरेशन साठी अगदी मोफत सर्जरी आणि गोरगरिबांचे उपचार स्वखर्चाने केले आहेत. त्यांच्या साहित्यात आयुष्याचे तत्वज्ञान मांडताना ते म्हणतात.

*उम्र भर जाग के हमने जो संवारा है उसे,*
*अपने बच्चों को वही ख्वाब सुपुर्द करते हैं...*

डॉ. राहत इंदोरी आणि मुनव्वर राणांसारख्या दिग्गजांच्या पंक्तीत बसूनही त्यांचे पाय नेहमी जमिनीवर राहिले आहेत. नागपूरच्या डॉ. गिरीश गांधी फाउंडेशनचा 'पुरुषोत्तम गाडगे स्मृती काव्य पुरस्कार' असेल किंवा या असंख्य पुरस्कार हे त्यांच्या प्रतिभेचा आणि बुलढाण्याच्या सांस्कृतिक वारशाचा मोठा सन्मान आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर.

*किसी भी बज्म में जाकर उजाला कर देंगे,*
*चिराग है, कोई अगर हमको जलाए तो...!"*

दादा, तुमची नजर ही केवळ एक डॉक्टरची नजर नाही, तर ती माणुसकीची नजर आहे. म्हणूनच तुम्ही लिहिल्याप्रमाणे.

*खुदा करे सभी को 'तेरी निगाह मिले,*
*तेरी निगाह से दुनिया हसीन लगती है..!*

अशा या 'शब्दांच्या बादशहाला' माझ्या आदर्श मोठ्या भावाला' आणि 'रुग्णांच्या मसिहाला' वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा! तुमचा हा सेवायज्ञ असाच अविरत चालू राहो, हीच निर्मिका चरणी नम्र प्रार्थना.

**- अरुण गायकवाड**
**(लहान भाऊ)**
**डोणगांव**

## ताडदेवमध्ये भाजप-शिवसेना ठाकरे गटात राडा!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईतील ताडदेव परिसरात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानापूर्वी काही तास शिल्लक असताना पैशांच्या वाटपावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राज्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे निकटवर्तीय मानले जाणारे भाजप कार्यकर्ते प्रदीप छेडा, प्रकाश मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून पैशांचे वाटप केले जात असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक महिलांनी केला आहे.

या प्रकाराला स्थानिक महिलांनी तीव्र विरोध दर्शवल्यानंतर आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी जाब विचारण्यास सुरुवात केल्यानंतर संबंधित भाजप कार्यकर्त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. मतदानाच्या तोंडावर घडलेल्या या प्रकारामुळे ताडदेव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून आचारसंहितेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मुंबईतील ताडदेव येथील वॉर्ड क्रमांक 215 मध्ये मतदानाच्या पूर्वसंध्येला पैशांच्या वाटपावरून मोठा गदारोळ झाला. भाजपचे नेते मंगल प्रभात लोढा यांचे निकटवर्तीय प्रदीप छेडा, प्रकाश मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली मतदारांना पैसे वाटल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. विशेष म्हणजे, संबंधित इमारतीमधील महिलांनी या कार्यकर्त्यांना उलट प्रश्न विचारून जाब विचारला असता, त्यांनी तिथून पळ काढला. या प्रकारामुळे ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून, मतदानाच्या अवघ्या काही तास आधी ताडदेव परिसरातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

## "रोटरी क्लब ऑफ पेणच्या उपस्थितीत सुहित जीवन ट्रस्टमध्ये शाळा अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे शानदार आयोजन"

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **किरण बांधणकर**

**पेण :** मंगळवार, दिनांक 13 जानेवारी, 2026 रोजी सुहित जीवन ट्रस्ट संस्थेमध्ये शाळा अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ पेणचे मान्यवर पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी सचिन शिगवण (रोटरी क्लब ऑफ पेण प्रेसिडेंट), रोहन मनोरे (सेक्रेटरी), इम्तियाज मणियार (भावी प्रेसिडेंट) हरीश बेकावडे (समाजसेवक), विनय शहा अशोक जैन जयेश शहा, अनिल ईश्वरे, राधा मनोरे, मुकुंद टेमघरे हे मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत सहभागी व विजयी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी रोटरी क्लब ऑफ पेण यांच्या सहकार्याने पालक व विद्यार्थ्यांसाठी बक्षीस स्वरूपात प्रायोजकत्व देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या आरंभी *मशाल प्रज्वलित करून क्रीडा संबंधित साधनांचे पूजन करण्यात आले. गोळा फेक या खेळाद्वारे सामन्यांची सुरुवात करण्यात आली ज्यामध्ये क्लबच्या सदस्यांनी आनंदाने सहभाग घेतला. संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा डॉ. सुरेखा पाटील यांनी रोटरी क्लब ऑफ पेणच्या मान्यवर पाहुण्यांचे स्वागत केले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांसह पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. 100 मीटर धावणे, गोळा फेक, सॉफ्टबॉल थ्रो, बादलीत बॉल टाकणे, लांब उडी, टेबल टेनिस तसेच चमचा–लिंबू अशा विविध मनोरंजक व कौशल्यवर्धक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ पेण मधील सभासदांनी आपला मौल्यवान वेळ देऊन या विशेष विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेमध्ये अतिशय उत्स्फूर्तपणे व सक्रिय सहभाग घेतला ज्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे मनोबल, आनंद व आत्मविश्वास द्विगुणित झाला. ही सामाजिक बांधिलकी जपणारी बाब आहे व जगभरात रोटरी क्लब हा नेहमीच या बाबतीत अग्रेसर आहे हे त्यांनी पुन्हा एकदा दाखवून दिले. रोटरी क्लब ऑफ पेणच्या सभासदांनी शाळेची पहाणी करून या विशेष विद्यार्थ्यांसाठी असलेल्या भव्य, सुसज्ज व सर्व सुविधायुक्त इमारतीचे, त्यातील स्वच्छतेचे व संस्थेच्या एकूणच कार्याचे भरभरून कौतुक केले. संस्थेच्या भविष्यातील उपक्रमांना देखील रोटरी क्लब ऑफ पेणचा असाच पाठिंबा राहील याची ग्वाही दिली.



# मतदान : हक्कापलीकडे जाऊन लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन

**लोकशाही म्हणजे केवळ राज्यघटना, निवडणुका किंवा सत्ता बदलाची यंत्रणा नव्हे; लोकशाही म्हणजे सतत जागृत असलेली नागरिकांची जाणीव. या जाणीवेचा सर्वात प्रभावी, शांत आणि घटनात्मक आविष्कार म्हणजे मतदान. मतदानाला आपण अनेकदा "माझा हक्क" म्हणून संबोधतो. ते खरेही आहे. पण केवळ हक्क म्हणून मतदानाकडे पाहणे ही लोकशाहीची कक्षा मर्यादित करणारी भूमिका ठरते. वास्तवात मतदान हे केवळ हक्क नसून, लोकशाही जपण्याचे, टिकवण्याचे आणि सुधारण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. आजच्या काळात मतदानाबाबत वाढणारी उदासीनता, 'एक मताने काय फरक पडतो?' असा प्रश्न, किंवा 'सगळेच सारखे आहेत' ही मानसिकता, या साऱ्या प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहेत. कारण लोकशाही निवडणुकीत मरत नाही; ती मतदान न करण्याच्या उदासीनतेत हळूहळू कोमेजते.**



भारताने स्वातंत्र्य मिळवले तेव्हा जगातील अनेक देशांत सार्वत्रिक मतदानाचा हक्क नव्हता. शिक्षण, संपत्ती, जात, लिंग यांवर आधारित मताधिकाराच्या अटी होत्या. पण भारतीय राज्यघटनेने वयाची अट सोडली तर कोणताही भेद न करता मतदानाचा अधिकार दिला. हा निर्णय म्हणजे केवळ कायदेशीर तरतूद नव्हती; तो होता समतेचा, विश्वासाचा आणि नागरिकत्वाच्या सन्मानाचा घोष. मतदान हा बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेचा गाभा होता. त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीही आवश्यक आहे. मतदानाद्वारे सामान्य माणसाला सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग मिळतो. त्यामुळे मतदान म्हणजे कागदावर उमटवलेली खूण नसून, इतिहास घडवणारी कृती आहे. हक्क आणि जबाबदारी यांत मूलभूत फरक आहे. हक्क मिळाल्यावर तो वापरणे अथवा न वापरणे हा वैयक्तिक निर्णय असू शकतो. पण मतदान ही जबाबदारी आहे, कारण त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर, पुढील पिढ्यांवर आणि राष्ट्राच्या भवितव्यावर होतो. मतदान न करणे ही तटस्थता नसून, ती अनेकदा चुकीच्या शक्तींना मोकळे रान देणारी भूमिका ठरते. मतदान न करणारा नागरिक अप्रत्यक्षपणे म्हणतो, "जे होईल ते चालेल." पण लोकशाहीत 'जे होईल ते चालेल' अशी भूमिका स्वीकारली, की लोकशाही हळूहळू हुकूमशाहीकडे झुकू लागते. म्हणूनच मतदान हे केवळ अधिकाराचे नव्हे, तर जबाबदारीचे आणि नैतिक कर्तव्याचे साधन आहे. "एका मताने काय फरक पडतो?" हा प्रश्न लोकशाहीबद्दलच्या गैरसमजाचे द्योतक आहे. इतिहास साक्षी आहे की अनेक निवडणुका काही मतांच्या फरकाने जिंकल्या गेल्या आहेत. पण मुद्दा केवळ आकड्यांचा नाही. एक मत म्हणजे एक आवाज, आणि लाखो आवाज मिळून जनमत तयार होते. एक मत हे निषेधाचे साधन असू शकते, समर्थनाचे साधन असू शकते, बदलाची सुरुवात असू शकते. मतदान म्हणजे सत्ताधाऱ्यांना दिलेला पाच वर्षांचा 'ब्लँक चेक' नसून, तो असतो जबाबदारीचा परवाना काम चांगले केले तर पाठिंबा, अन्यथा नकार. लोकशाहीतील सर्वात मोठा धोका बाहेरून येत नाही; तो आतूनच निर्माण होतो, नागरिकांच्या उदासीनतेतून. जेव्हा लोक मतदानाकडे पाठ फिरवतात, तेव्हा अल्पसंख्याक मतांनी निवडलेली सत्ता बहुसंख्याकांवर राज्य करू लागते. अशा वेळी लोकशाही औपचारिक राहते, पण तिचा आत्मा मरतो. मतदान हे लोकशाहीचे संरक्षण कवच आहे. ते सत्तेला मर्यादा घालते, सत्ताधाऱ्यांना जनतेसमोर जबाबदार ठेवते आणि संस्थांना स्वायत्त ठेवण्यास मदत करते. नियमित, मुक्त आणि निष्पक्ष मतदान हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. पण निवडणुकांमध्ये युवकांचा सहभाग अपेक्षेइतका दिसत नाही. सोशल मीडियावर मतप्रदर्शन करणारा तरुण अनेकदा मतदान केंद्रापर्यंत जात नाही. ही विसंगती धोकादायक आहे. कारण सोशल मीडियावरील प्रतिक्रिया क्षणिक असतात; मतदान मात्र स्थायी परिणाम घडवते.युवकांनी मतदानाकडे केवळ अधिकार म्हणून नव्हे, तर भविष्य घडवण्याचे साधन म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षण, रोजगार, पर्यावरण, सामाजिक न्याय... या सगळ्या प्रश्नांची दिशा मतदानातून ठरते. मतदान न करणारा तरुण उद्याच्या समस्यांवर तक्रार करण्याचा नैतिक अधिकार गमावतो. मतदान हे केवळ राजकीय साधन नसून, ते सामाजिक समतेचे प्रभावी अस्त्र आहे. इतिहासात वंचित, दलित, आदिवासी, महिला यांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी मोठे संघर्ष करावे लागले. आज त्या हक्काचा वापर न करणे म्हणजे त्या संघर्षांचा अवमान ठरतो. मतदानामुळेच वंचित घटकांचे प्रश्न विधानसभेत, संसदेत पोहोचतात. मतदानाद्वारेच प्रतिनिधित्व बदलते, धोरणे बदलतात. त्यामुळे मतदान हे केवळ स्वतःसाठी नव्हे, तर ज्यांचा आवाज दबला आहे त्यांच्यासाठीही महत्त्वाचे आहे. लोकशाहीत मतदान म्हणजे केवळ एखाद्या उमेदवाराला निवडणे नव्हे; तर असमाधान नोंदवण्याचाही मार्ग आहे. 'नोटा' हा पर्याय लोकशाहीतील असहमतीचा वैधानिक मार्ग आहे. सर्वच उमेदवार अयोग्य वाटत असतील, तरी मतदान केंद्रावर जाऊन आपली भूमिका नोंदवणे हे लोकशाहीला बळ देणारे कृत्य आहे. मतदान न करणे आणि 'नोटा'ला मतदान करणे यात मूलभूत फरक आहे. मतदान न करणे म्हणजे मौन; 'नोटा' म्हणजे सजग निषेध. मतदान हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित कृत्य नाही; ते लोकशाहीचा श्वास आहे. श्वास थांबला, तर शरीर जिवंत राहत नाही; तसेच मतदान थांबले, तर लोकशाही नावापुरती उरते. म्हणून मतदानाकडे केवळ "माझा हक्क" म्हणून पाहणे अपुरे आहे. ते आहे माझी जबाबदारी, माझे कर्तव्य आणि माझी ताकद. लोकशाही जपायची असेल, तर ती वापरावी लागते. मतदानाद्वारे सजगपणे आणि निर्भयपणे, कारण मतपेटीत टाकलेले प्रत्येक मत हे केवळ कागद नसते तर ते असते लोकशाही जिवंत ठेवणारे वचन.



**प्रवीण बागडे**
**नागपूर, 9923620919**
**बातमी जगत**

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S.) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S.) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही.) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील.) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S.) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S.). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act.) All disputes will be subject to Mehkar Court.) RNI No. MHBIL/25/A1435

## थोडक्यात

### श्री शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे चित्रकला परीक्षेत सुयश

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ अनिल राठोड

**डोणगाव :** मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील श्री शिवाजी हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी 2025 मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेतील एलिमेंट्री आणि इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.या परीक्षेत श्री शिवाजी हायस्कूल चा शंभर टक्के निकाल लागला असून यामधील एलिमेंट्री परीक्षेत चार विद्यार्थी 'ए' ग्रेडमध्ये,तीन विद्यार्थी 'बी' ग्रेडमध्ये तर वीस विद्यार्थी "सी" ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले आहे.आणि इंटरमिजिएट परीक्षेत दोन विद्यार्थी 'ए 'ग्रेड मध्ये चार विद्यार्थी 'बी 'ग्रेड मध्ये तर सहा विद्यार्थी 'सी' ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले आहे या चित्रकला परीक्षेत एकूण 39 विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. या परीक्षेसाठी ज्येष्ठ व कलाशिक्षक गजेंद्र माने,गणित शिक्षक माधव शेळके, व अंकुश डुकरे यांनी मार्गदर्शन केले होते. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र आखाडे,उपाध्यक्ष सुरेशपंत बाजड, कोषाध्यक्ष बळीरामजी बाजड तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ व मुख्याध्यापक संजय बाजड,उपमुख्याध्यापक सुरेंद्रसिंह चव्हाण, पर्यवेक्षक किरण आखाडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.



### रुम्हणा येथे माजी विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर संपन्न

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सज्जन शेळके

**सिंदखेडराजा :** रुम्हणा येथील कै.तुकाराम कायंदे विद्यालयाच्या वर्ग १० वी सण २०००-२००१ साल च्या माजी विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय स्थानी विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस.बी.जायभाये प्रमुख अतिथी पदी संस्थेचे सचिव शिवराजभाऊ कायंदे तर विशेष उपस्थितीमध्ये त्या वेळेचे शिक्षक आर.एस.कायंदे,इंग्रजी शिक्षक उद्धव गवई, बी.एस.आघाव,जी.के.कायंदे हे उपस्थित होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा. व्ही.टी.खरात,प्रा.के.पी.डोईफोडे,राहुल कायंदे वरिष्ठ लिपिक प्रतापराव जायभाये,सेवानिवृत्त शिपाई शिवलाल खरोळे हे उपस्थित होते. मी समाजाचे देणे लागतो या उदात्त हेतूने प्रेरित होऊन तब्बल ७६ माजी विद्यार्थी एकत्र येऊन विद्यालयासाठी अत्याधुनिक शिक्षण उपयोगी ४४ इंच स्मार्ट टीव्ही भेट दिला. प्रसंगी सर्व उपस्थित शिक्षकांना फेटे बांधून व शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले,विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून हे गेट-टुगेदर केवळ मनोरंजनासाठी आयोजित केले नसून एकमेकांच्या सुख दुःखामध्ये सहभागी होण्यासाठी आयोजित केले आहे असे विशद केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी माजी विद्यार्थी विनायक कायंदे,सतीश कायंदे,रामेश्वर खरोळे,अनिल पोटे,विलास कऱ्हाळे तसेच उज्वला कायंदे,सरिता नरवडे व ज्योती डोळे यांनी पुढाकार घेतला होता. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शिक्षक विनायक कायंदे यांनी केले तर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### भाजप-शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते भिडले, माजी महापौरच्या समोरच तूफान हाणामारी

बातमी जगत | प्रतिनिधी

**नवी मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या आदल्या दिवशीच अनेक ठिकाणी राजकीय संघर्ष पाहायला मिळत आहे. कुठे पैसे वाटल्याच्या कारणाने राडा होत आहे, तर कुठे दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद होत आहेत. असेच काहीसे चित्र नवी मुंबईत बघायला मिळाले आहे. येथील घणसोली परिसरात भाजप आणि शिवसेना शिंदे गटात जोरदार हाणामारी झाली आहे. भाजपचे नेते व माजी महापौर यांच्या उपस्थितीतच ही हाणामारी झाली. मंगळवारी रात्री घणसोली येथे भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली आणि या वादाचे रूपांतर थेट हाणामारीमध्ये झाले होते. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेजही सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. दरम्यान, महायुतीमधील घटक पक्षांमध्येच हा राडा होत असल्याने अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गट आणि भाजप हे एकत्रित निवडणूक लढवत असले तरी काही ठिकाणी धुसफूस सुरूच असल्याचे दिसून येत आहे. याचा परिणाम आता निवडणुकीवर कसा होतो याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## पान एक वरून

बॉलिवूड अभिनेत्री अमीषा पटेलने तिच्या चाहत्यांना बनावट नंबरपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे. अमीषाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये एका संशयास्पद कॉन्टॅक्टचा स्क्रीनशॉट शेअर करत सांगितले की, कोणीतरी तिच्या नावाचा आणि फोटोचा वापर करत आहे. तिने स्पष्ट केले की, प्रसारित होत असलेला नंबर तिचा नाही. स्क्रीनशॉटसोबत अभिनेत्रीने लिहिले- 'हा नंबर बनावट आहे आणि ही व्यक्ती फसवणूक करणारी आहे. कृपया याच्या जाळ्यात अडकू नका. ही मी नाही.' अभिनेत्रीने सोशल मीडियावर लोकांना या घोटाळ्याबद्दल सतर्क करत आवाहन केले आहे की, तिच्या नावाने केलेल्या कोणत्याही बनावट कॉल किंवा मेसेजला बळी पडू नका आणि सावध रहा. या संपूर्ण प्रकरणावर चिंता व्यक्त करत, अमीषा म्हणाली की डिजिटल स्पेसमध्ये चुकीची माहिती किती सहजपणे पसरू शकते, विशेषतः जेव्हा त्यात सार्वजनिक व्यक्तींचा समावेश असतो. या मुद्द्याच्या गांभीर्यावर जोर देत, तिने चाहत्यांना इशारा दिला की बनावट नंबरमागील व्यक्ती तिच्या ओळखीचा गैरवापर करून लोकांना फसवण्याचा प्रयत्न करू शकतो. अमीषाच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, 2023 मध्ये तिचा 'गदर-2' चित्रपट आला होता, जो तिचा कमबॅक चित्रपट होता. हा अभिनेत्रीचा आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला.

# महेश डोंगरे पाटील यांच्या मागणीला यश; समुद्रमंथनाची प्राचीन मूर्ती दर्शनासाठी खुली

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ शिवाजी वायाळ






**सिंदखेडराजा :** येथील ऐतिहासिक श्रीमंत लखुजीराव जाधव यांच्या समाधी परिसरात नुकतीच सापडलेली समुद्रमंथनाची प्राचीन मूर्ती अखेर सर्वसामान्य नागरिकांच्या दर्शनासाठी खुली करण्यात आली आहे. १२ जानेवारी २०२६ पासून या दुर्मिळ व ऐतिहासिक मूर्तीचे दर्शन खुले झाले असून, पहिल्याच दिवशी हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. पुढील काळातही ही मूर्ती दर्शनासाठी खुली राहणार असल्याचे संबंधित विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या मौल्यवान ऐतिहासिक ठेव्याच्या जतन व संवर्धनासाठी उभारण्यात आलेल्या मूर्ती संग्रहालयाचे उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी सिंदखेडराजा हे शहर गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार असल्याचे सांगितले. येथे सापडलेली समुद्रमंथनाची मूर्ती ही परिसराच्या सांस्कृतिक व पुरातत्त्वीय वारशात मोलाची भर घालणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या संग्रहालयाच्या माध्यमातून भावी पिढ्यांना इतिहासाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होणार असून, सिंदखेडराजाच्या ऐतिहासिक ओळखीला नवी ऊर्जा मिळेल, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, ही मूर्ती सर्वसामान्य नागरिकांसाठी दर्शनासाठी खुली करण्यात यावी, या मागणीसाठी छत्रपती मराठा सेना संस्थापक अध्यक्ष व मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक महेश डोंगरे पाटील यांनी कार्यकर्त्यांसह ९ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी अशोक राजे जाधव, दीपक किंगरे, बाळासाहेब शेळके, गुलाबराव राठोड, अतिश राजे जाधव, शंकर शिंदे यांच्यासह मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत शासन व प्रशासनाकडे ठोस मागणी करण्यात आली होती. या मागणीची संबंधित विभागाने दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार समुद्रमंथनाची प्राचीन मूर्ती नागरिकांच्या दर्शनासाठी खुली करण्यात आली. या निर्णयाचे महेश डोंगरे पाटील यांनी स्वागत केले. १२ जानेवारी रोजी झालेल्या उद्घाटनानंतर मोठ्या संख्येने जिजाऊ भक्त, इतिहासप्रेमी, देशभरातून आलेले भाविक तसेच स्थानिक नागरिकांनी या मूर्तीचे दर्शन घेतले. विशेष म्हणजे, दैनिक पुढारी आणि दैनिक महाभूमी या विषयावर केलेल्या सातत्यपूर्ण वृत्तांकनाची शासन व प्रशासनाने दखल घेतल्याने हा ऐतिहासिक ठेवा सर्वसामान्यांसाठी खुला होण्याचा मार्ग मोकळा झाला. या संग्रहालयामुळे पर्यटनाला चालना मिळेल तसेच सिंदखेडराजाची ऐतिहासिक ओळख अधिक भक्कम होईल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## नराधम शिक्षक की वासनांध सैतान? ५ चिमुरड्यांवर २ वर्षे लैंगिक अत्याचार; छत्रपती संभाजीनगर हादरले!

**विद्येच्या मंदिरात गुरु-शिष्याच्या पवित्र नात्याला काळिमा; सिडको एमआयडीसी परिसरातील संतापजनक प्रकार.**

बातमी जगत | प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** ज्या शिक्षकाला समाजांत 'देवाचे रूप' मानले जाते, त्याच शिक्षकाने वासनेच्या आहारी जाऊन पाच अल्पवयीन विद्यार्थिनींचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केल्याची संतापजनक घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आली आहे. सिडको एमआयडीसी परिसरातील एका खासगी शाळेत हा 'भक्षक' शिक्षक गेल्या दोन वर्षांपासून चिमुरड्यांचा लैंगिक छळ करत होता. या घटनेने पालकांमध्ये प्रचंड संताप असून 'शाळेतही आमची मुले सुरक्षित नाहीत का?' असा आर्त सवाल उपस्थित होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खाजी मूजिबोद्दीन नसीरोद्दीन (वय ४० वर्षे) हा आरोपी २०१४ पासून या शाळेत कार्यरत आहे. नेहमी गुटखा खाऊन शाळेत येणाऱ्या या शिक्षकाने २०२४ ते २०२६ या दोन वर्षांच्या काळात सहावी आणि सातवीत शिकणाऱ्या (१४ ते १५ वयोगटातील) पाच विद्यार्थिनींना आपले लक्ष्य केले. हा वासनांध शिक्षक वर्गात मुलींसोबत अश्लील चाळे करायचा. इतकेच नव्हे तर, 'धार्मिक प्रार्थना का करत नाही?' असे क्षुल्लक कारण काढून तो या मुलींना बेदम मारहाण करत आपली दहशत निर्माण करायचा. आरोपीच्या दहशतीमुळे या मुली गप्प होत्या, मात्र त्यांच्या वागण्यातील बदल आणि चेहऱ्यावरील भीती पालकांच्या नजरेतून सुटली नाही. पालकांनी मुलींना विश्वासात घेऊन विचारणा केली असता, या नराधमाचे पाशवी रूप समोर आले. मुलींनी आपल्यावर बेतलेला प्रसंग कथन करताच पालकांच्या पायाखालची जमीन सरकली. घटनेचे गांभीर्य ओळखून पालकांनी शाळा व्यवस्थापनाकडे धाव घेतली. मुख्याध्यापिकेने तात्काळ आरोपीला नोटीस बजावली, मात्र चौकशीला गैरहजर राहून त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला. अखेर शाळेने पोलिसांत तक्रार दाखल केली. सिडको एमआयडीसी पोलिसांनी खाजी मूजिबोद्दीन नसीरोद्दीन याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राधा लाटे करत आहेत.शाळा हे विद्येचे माहेरघर आहे, तिथे अशा नराधमांना स्थान मिळणे हे समाजाचे अपयश आहे. अशा नराधमाला कठोर शिक्षा व्हावी, जेणेकरून पुन्हा कोणत्याही 'गुरु'चे पाऊल या वाटेला जाणार नाही.

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या नगर जिल्हाध्यक्षपदी सुनील सोनावणे यांची नियुक्ती

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ बाळासाहेब दुधाळे



**शिर्डी :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या संघटनात्मक बांधणीला गती देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी, सुनील सोनावणे यांची नगर जिल्हाध्यक्ष (अहिल्यानगर) पदी नियुक्ती करण्यात आली आहे. महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. डॉ. पी. बी. कुंभार आणि जनरल सेक्रेटी सुभाष वा. मुळे यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे. या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील ओबीसी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.या पत्राद्वारे सोनावणे यांना समाजाप्रती असलेल्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्यात आली आहे,त्यामध्ये महासंघाची घटना आणि ध्येयधोरणांनुसार विविध जाती-जमातींमधील कार्यकर्त्यांना एकत्र आणणे. ओबीसी समाजाच्या हितासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी प्रभावीपणे काम करणे. आपल्या अनुभवाच्या जोरावर महासंघाची व्याप्ती वाढवणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे. पुढील निर्णय व आदेश येईपर्यंत सुनील सोनावणे या पदाचा कार्यभार सांभाळणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल जिल्ह्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली नगर जिल्ह्यातील ओबीसी चळवळ अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## संविधान जागर अभियानांतर्गत करवंड येथे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

बातमी जगत | प्रतिनिधी



**सेलसूर :** संविधान जागर अभियान तसेच सत्यशोधक शिक्षक सभा पुणे यांच्यावतीने व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय मंडळ सेल्सुर यांच्या पुढाकाराने माध्यमिक आश्रम शाळा करवंड येथे संविधान जागर अभियानांतर्गत एकदिवसीय कार्यशाळा दिनांक अकरा जानेवारी रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेत संस्थेअंतर्गत तीन शाळातील सुमारे तिस शिक्षकांनी सहभाग घेतला. यावेळी प्राध्यापक तुषार र.ह. प्रा. मोहन कंकाळ व प्रा. तुषार यांनी गीते, पोवाडे व पावर पॉइंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून संविधान व त्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.प्रा. तुषार यांनी संविधानाचा मूळ हेतू हा चांगला नागरिक घडवणे हा असून संविधानात संतांचा व स्वराज्याचा विचार समाविष्ट असल्याने तेच भारताच्या विविधतेचे व एकात्मतेचे रक्षण करू शकते असे प्रतिपादन केले. संविधानातील सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष इत्यादी संकल्पनांचा अर्थ समजाउन सांगितला. कल्याणकारी राज्याची संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी तसेच भारताच्या विकासासाठी संविधान संविधान हे अतिशय महत्त्वपूर्ण असून त्याचा प्रचार आणि प्रसार सर्वसामान्य पर्यंत होणे गरजेचे आहे असे शेवटी त्यांनी नमूद केले. प्रास्ताविक संग्राम देशमुख यांनी, सूत्रसंचालन मंगेश पाटील यांनी तर आभार प्रदर्शन केसकर सर यांनी केले.

## राहुलभाऊ बोंद्रे यांची जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा निरीक्षकपदी निवड

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ गजानन दसरकर



**बुलढाणा :** महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी बुलढाणा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुलभाऊ बोंद्रे यांच्याकडे सोपवली आहे. कॉंग्रेस पक्षाच्या वतीने त्यांची जिल्हा निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, निवडणूक प्रक्रियेत समन्वय, मार्गदर्शन आणि संघटनात्मक बांधणीची प्रमुख जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनदादा सपकाळ यांच्या आदेशावरुन प्रदेश कॉंग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी यासंदर्भात अधिकृत पत्र जारी केले आहे. या पत्रानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व आघाडी घटकांशी समन्वय साधून निवडणूक रणनिती प्रभावीपणे राबवण्याची जबाबदारी राहुलभाऊ बोंद्रे यांच्याकडे देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत कॉंग्रेसला भक्कम यश मिळवून देण्यासाठी नियोजन, समन्वय आणि कार्यकर्त्यांची मोट बांधण्याची जबाबदारी आता राहुलभाऊ बोंद्रे यांच्यावर असणार आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वाचा फायदा कॉंग्रेसला निश्चितच होईल, अशी पक्षात अपेक्षा व्यक्त होत आहे. राहुलभाऊ बोंद्रे यांनी यापूर्वी कर्नाटक व मध्यप्रदेश विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षासाठी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. नुकत्याच पार पडलेल्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीतही त्यांनी निरीक्षक म्हणून प्रभावी कामगिरी बजावली. त्यामुळेच त्यांच्यावर पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. बुलढाणा जिल्ह्यात त्यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पक्षाने उल्लेखनीय यश मिळवले आहे. लोणार, मलकापूर व शेगाव येथे कॉंग्रेसचे नगराध्यक्ष विराजमान झाले असून जिल्ह्यात एकूण ६० कॉंग्रेस नगरसेवक निवडून आले आहेत. संघटन मजबूत करत तळागाळापर्यंत पक्ष पोहोचवण्याचे श्रेय राहुलभाऊ बोंद्रे यांच्या नेतृत्वाला जाते.

## दे.माळी येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत






**देऊळगावळी :** येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेत १२ जानेवारी रोजी 'स्त्रीशक्तीचे मूर्तिमंत रूप' राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि 'युवाशक्तीचे प्रेरणास्थान' स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा सोहळा केवळ औपचारिक न ठरता संस्कारांची शिदोरी देणारा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक आणि सर्व सदस्य, पालक व शिक्षक यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी दुसरी, तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊंची वेशभूषा साकारली होती. त्यांच्या त्या करारी आणि तेजस्वी रूपाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. जणू काही बाल शिवबांना घडवणाऱ्या जिजाऊ या चिमुकल्यांच्या रूपाने अवतरल्या आहेत, असा भास होत होता.याप्रसंगी शिक्षक अरुण बळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी राजमाता जिजाऊंचे जाज्वल्य चारित्र्य आणि स्वामी विवेकानंदांचे जागतिक स्तरावरील महान कार्य यावर प्रकाश टाकला. "आजच्या पिढीला जर भविष्यातील आव्हाने पेलवायची असतील, तर जिजाऊंचा संस्कार आणि विवेकानंदांचा विचार आत्मसात करणे काळाची गरज आहे," असे विचार त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक पवनकुमार लालाजी गोवेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत मगर यांच्यासह शिक्षक सखाराम आनंदा बळी, रामकिसन अर्जुन महाकाळ, अरुण गंगाराम बळी, संजय सुदामराव कंकाळ, अंकुश रामदास आटोळे आणि शिक्षिका उषा पांडुरंग केंधळे, सुषमा काशिनाथ सुरवाडे, सुनीता भागवत भराड उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंदाने अथक परिश्रम घेतले. या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम आणि थोर पुरुषांच्या कार्याप्रती आदरभाव वृद्धिंगत झाल्याचे पाहायला मिळाले.

## थोडक्यात




### जि.प.उच्च प्राथ. शाळा, राजुरा राव येथील विद्यार्थ्यांनी घेतला शैक्षणिक सहलीचा आनंद

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ राजु नेहुल

**रिसोड :** मालेगाव पंचायत समिती अंतर्गत जि. प.उच्च प्राथ शाळा, राजुरा राव शाळेची शैक्षणिक सहल विविध भौगोलिक, ऐतिहासिक, तीर्थक्षेत्र इत्यादी ठिकाणी भेट देऊन दिनांक 10 व 11 जानेवारीला नुकतीच पार पडली. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक,भौगोलिक,तीर्थक्षेत्र इत्यादी स्थळांची प्रत्यक्षदर्शी माहिती व ज्ञान याचा लाभ व्हावा तसेच सामाजिक जाणीव व पुढील आयुष्यात उपयोग व्हावा हे या सहलीमागील उद्दिष्ट होते. सहलीमध्ये देवगड,नेवासा, शनिशिंगणापूर, सोनई रेणुका माता देवी,पैठण नाथसागर व बगीचा,भद्रा मारुती,वेरूळ लेण्या, घृष्णेश्वर मंदिर, दौलताबाद किल्ला,सिद्धार्थ गार्डन इत्यादी स्थळांचा समावेश होता. शेवटी 12 जानेवारीच्या सकाळी चिमूकल्या मावळ्यांनी राष्ट्रमाता,राजमाता माँ जिजाऊ यांच्या जयंती निमित्त नतमस्तक होऊन मानाचा मुजरा केला आणि सहलीचा समारोप करण्यात झाला. शैक्षणिक सहलीचे आयोजन मुख्याध्यापक संभाजी साळसुंदर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते.शैक्षणिक सहलीत एकूण शाळेतील 44 विद्यार्थी व पाच शिक्षक सहभागी झाले होते. यामध्ये सहभागी शिक्षक महादेव ठाकरे, संजीव डिघोळे, छाया डिघोळे,गणेश धोंगडे,नरेंद्र उगले, देवीसिंग पडवाल इत्यादी शिक्षकांचे सहकार्य लाभले. तसेच शाळा व्यवस्थापन अध्यक्ष संदीप क्षीरसागर, उपाध्यक्ष रमेश सानप, सदस्य प्रवीणभाऊ सोनोने व सर्व सदस्यांचे खूप सहकार्य लाभले.



### धावत्या बसचे टायर निघाले; शहापूर आगाराचा भोंगळ पणा पुन्हा समोर

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ वसंत पानसरे

**ठाणे :** महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळंच्या शहापूर आगारात प्रवाश्यांच्या सेवेसाठी असणाऱ्या बसेस भंगार, जीर्ण आणि कालबाह्य झाल्या असून दररोज कुठे ना कुठे बंद पडत आहेत. तर कुठे मोठया प्रमाणात अपघात देखील होत आहेत.याचा थेट फटका ग्रामीण भागातील प्रवाश्यांना बसत असुन वेळप्रसंगी या बसेस मधून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार चालू आहे. आत्ताच धावत्या बसचे छप्पर उडाल्याची घटना ताजी असतानाच आज चक्क धावत्या बसचे टायर निघाल्याची घटना घडली असून सुदैवान प्रवाशी थोडक्यात बचावले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार शहापूर आगाराची बस शहापूर येथून किन्हवली कडे संध्याकाळी ४:१५ वा निघालेली एम एच २० बी एल १४८६, किन्हवली बस ही गुरुकुल नगर ( किन्हवली ) जवळ आली असता धावत्या अवस्थेत पाठी मागचे एका बाजूचे दोन्ही टायर बाहेर आले.प्रवाश्यांचे दैव बळवत्तर म्हणून ते टायर बसच्या बॉडी पत्र्यात अडकल्या ने दुर्घटना टळली.नाहीतर मोठी दुर्घटना घडली असती. या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षितेचा प्रश्न एरनीवर आला असून प्रवासी यावर नाराजी वक्त करत आहेत एस टी महामंडळ प्रवाशांच्या जीवाशी कधी पर्यन्त खेळणार?असा संतप्त सवाल करत आहेत.

# लोकांच्या मनात संत चोखा रुजल्याशिवाय जन्मस्थळाचा खरा विकास व लोकोत्सव घडणार नाही - माजी आ. डॉ. राजेंद्र शिंगणे

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ राजेश पंडित



**देऊळगाव राजा :** महाराष्ट्र ही संतांची भूमी असून याच पावन मातीत १२व्या शतकात विठ्ठल भक्त, विद्रोही संत चोखामेळा यांचा जन्म झाला. १४ जानेवारी १२६८ रोजी मेहकर तालुक्यातील मेव्हणाराजा येथे जन्मलेल्या संत चोखामेळा यांनी महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला मानवता, समता व भक्तीचा अमूल्य संदेश दिला. मात्र केवळ भौतिक विकासानेच जन्मस्थळाचा खरा विकास होत नाही; जोपर्यंत लोकांच्या मनात संत चोखामेळा रुजणार नाहीत, तोपर्यंत जन्मस्थळाचा विकास आणि लोकोत्सव घडणार नाही, असे ठाम मत माजी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी व्यक्त केले. ते संत चोखामेळा यांच्या ५५८ व्या जयंतीनिमित्त मिळवणा राजा येथे आयोजित भव्य जन्मोत्सव सोहळ्यात बोलत होते. संत चोखामेळा जन्मभूमीच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाला असून विविध विकासकामे सुरू आहेत; परंतु त्या कामांना विचारांची आणि जनमानसातील परिवर्तनाची जोड आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी चोखामेळा जन्मोत्सवाचे प्रवर्तक व काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी परखड विचार मांडले. सावित्रीबाई, जिजाऊ यांच्या सामाजिक क्रांतीला विरोध करणारे आणि विद्रोही संत चोखामेळांच्या विचारांना विरोध करणारे हे मनुवादी प्रवाह होते. चोखोबांनी बहुजनांना बोलते-लिहिते केले आणि वारकरी संप्रदायाने बहुजन समाजाला मानाचे स्थान मिळवून दिले, असे त्यांनी ठामपणे सांगितले. या जन्मोत्सव सोहळ्याची सुरुवात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या हस्ते संत चोखामेळा मंदिरात महाआरतीने झाली. त्यानंतर माजी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे व माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते चोखोबांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. जन्मोत्सवाच्या प्रमुख कार्यक्रमात संविधान चळवळीचे प्रा. तुषार यांनी कीर्तनाद्वारे संत चोखामेळा यांचे जीवन, त्यांचा संघर्ष, विद्रोह आणि भक्तीमार्ग प्रभावीपणे उलगडून दाखवला. सुमारे अर्धा तास चाललेल्या त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, “फक्त शासनाने निधी दिला नाही म्हणून ओरडत बसणे योग्य नाही. जन्मस्थळाच्या कासवगतीच्या विकासामागे गावकरी आणि लोकप्रतिनिधींमधील दुरावा कारणीभूत आहे. हा दुरावा दूर करून सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.”चोखामेळा जन्मस्थळ विकास प्रकल्पाचे नाम प्रवर्तक प्रा. कमलेश खिल्लारे यांनी विचारांचे समन्वय आणि लोकसहभागाशिवाय विकास अपूर्ण असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी मुकेश माहोर यांनी करताना चोखामेळा जन्मोत्सव हा खऱ्या अर्थाने लोकोत्सव व्हावा यासाठी ग्रामस्थांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल आभार मानले. या सोहळ्यास जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विकास पाटील, खडकपूर्णचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता डी. टी. शिंपणे गटशिक्षणाधिकारी दादासाहेब मुसदवांडे, सत्यशोधक शिक्षक सभेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. श्याम मुडे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बबन कुमठे, सरपंच मंदाताई बोंद्रे यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य बाबुराव नागरे, गंगाधर जाधव, शिवसेना नेते श्रीनिवास खेडेकर, भाजप नेते डॉ. सुनील कायंदे, तसेच विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत चोखामेळा यांचे विचार, आणि मानवतेचा संदेश जनमानसात रुजविल्याशिवाय त्यांच्या जन्मभूमीचा खरा गौरव होणार नाही, हा संदेश देणारा हा ५५८ वा जन्मोत्सव सोहळा इतिहासात कोरला

## एडवोकेट वैशाली अंभोरे यांचे राष्टमाता जिजाऊ जयंतीनिम्मित व्याख्यान

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ शिवाजी घायाळ



**लोणार :** स्थानिक महाराणा प्रताप हायस्कुलमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त सध्या वढव या गावच्या उपसरपंच असलेल्या ऑड वैशालीताई वाठोरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री.ढाकरे सर तर प्रमुख अतिथी म्हणून ऑड वैशालीताई अंभोरे तसेच शाळेच्या जेष्ठ शिक्षिका जैजाळ मॅडम यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात सुरुवातीलाच माता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांचे पूजन अध्यक्ष, व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते पार पडले. वर्ग 9 वी च्या विद्यार्थिनींनी कु.आरुषी राठोड ,कु.सोनाली चव्हाण व कोमल चव्हाण यांनी सुमधुर असे स्वागतगीत गाऊन पाहुण्यांचे स्वागत केले.त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख अतिथी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कु .ऋतुजा पांढरे हिने जिजाऊ वंदना गाऊन माँ जिजाऊंना वंदन केले, तसेच राजकुमार जारे या विद्यार्थ्याने जिजाऊंच्या प्रेमळपणाचे साक्ष देणारे भाषण सादर केले . प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या कु.जैजाळ मॅडम यांनी त्यांच्या भाषणातून क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले,राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला .तसेच प्रमुख व्याख्यात्या म्हणून लाभलेल्या ऑड वैशालीताई यांची जिजाऊंनी शिवरायांवर कसे संस्कार केले? व त्यांचे विचार आपण आचरणात आणले पाहिजे असा उपदेश आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना दिला. तसेच मुलींनी कोणत्याच अप प्रसंगला न घाबरता त्याला धीराने तोंड दिले पाहिजे,असा सल्ला आपल्या भाषणातून दिला.त्यानंतर अध्यक्ष असलेल्या ढाकरे सरांनी जिजाऊ गर्जना करत कार्यक्रमाची सांगता केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश शेटे सर यांनी केले.या कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक दहातोंडे सर ,सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर सर्व कारचर्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## टेंबुरखेड येथे संत जयराम महाराज यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ राहुल चव्हाण



**घाटबोरी :** मेहकर तालुक्यातील टेंबुरखेड येथील संत जयराम महाराज संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला राजकीय आणि आध्यात्मिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. टेंबुरखेड संस्थान हे भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे. कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये प्रमुख पाहुणे राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री ना. संजयभाऊ राठोड यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाले. त्यांच्यासोबतच केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, उद्योगपती किसन राठोड माजी आमदार संजय रायमुलकर आणि मेहकरचे नगराध्यक्ष किशोर गारोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. धार्मिक विधी: पोहरादेवी येथील महंत बाबुसिंगजी महाराज, महंत हितेश महाराज आणि मेहकरचे तहसीलदार यांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. स्वागत व सत्कार: संस्थानचे महंत हिम्मत महाराज यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. याप्रवेळी संपूर्ण बंजारा समाज बांधवांच्या वतीने मंत्री संजय राठोड यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या यात्रेनिमित्त महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला असून, परिसरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

## श्री शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे चित्रकला परीक्षेत सुयश

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ अनिल राठोड

**डोणगाव :** मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील श्री शिवाजी हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी 2025 मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेतील एलिमेंट्री आणि इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.या परीक्षेत श्री शिवाजी हायस्कूल चा शंभर टक्के निकाल लागला असून यामधील एलिमेंट्री परीक्षेत चार विद्यार्थी `ए` ग्रेडमध्ये,तीन विद्यार्थी `बी ` ग्रेडमध्ये तर वीस विद्यार्थी ``सी" ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले आहे.आणि इंटरमिजिएट परीक्षेत दोन विद्यार्थी `ए `ग्रेड मध्ये चार विद्यार्थी `बी `ग्रेड मध्ये तर सहा विद्यार्थी `सी` ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले आहे या चित्रकला परीक्षेत एकूण 39 विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. या परीक्षेसाठी ज्येष्ठ व कलाशिक्षक गजेंद्र माने,गणित शिक्षक माधव शेळके, व अंकुश डुकरे यांनी मार्गदर्शन केले होते.

संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र आखाडे,उपाध्यक्ष सुरेशपंत बाजड, कोषाध्यक्ष बळीरामजी बाजड तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ व मुख्याध्यापक संजय बाजड,उपमुख्याध्यापक सुरेंद्रसिंह चव्हाण, पर्यवेक्षक किरण आखाडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## राष्ट्रमाता जिजाऊंनी अंधश्रद्धा कधीच पाळली नाही - भिमराव परघरमोल

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ डॉ.भागवत वसे

**संग्रामपूर :** राष्ट्रमाता जिजाऊंनी उभ्या आयुष्यात अंधश्रद्धा कधीच पाळली नाही तर सतत वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना केली. असे प्रतिपादन भिमराव परघरमोल यांनी केले.



सविस्तर वृत्त असे की, राष्ट्रमाता जिजाऊंची ४२८ वी जयंती जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा उकळी बु। ता. संग्रामपूर जि. बुलढाणा येथे साजरी करण्यात आली या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन वर्ग ७ वी च्या विद्यार्थ्यांनी केले. तेव्हा अध्यक्षस्थानी कु. ईश्वरी वरटकार वर्ग ६ वा व प्रमुख अतिथी कु. निधी गोमासे वर्ग ६ वा या विद्यार्थिनी होत्या. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर भिमराव परघरमोल यांनी बोलताना सांगितले की, अभ्यासक्रमातून रुजवल्या जाणाऱ्या दहा नैतिक मूल्यांपैकी वैज्ञानिक दृष्टिकोन हे मूल्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, जे जिजाऊंनी साडेतीनशे वर्षापूर्वी जोपासले होते. त्यांनी पुणे या उजाळ आणि शापित शहरात वस्ती करताना अंधश्रद्धा लाथाडून मोठे धैर्य दाखवले, जे इतिहासामध्ये दखलपात्र आहे. याची अनेक उदाहरणे त्यांनी दिली. शाळेतील शिक्षिका कोकिळा बोपटे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला केशव डाबेराव (मुख्याध्यापक) शंकर बगाडे, प्रवीणकुमार लिंगोट, गजेंद्र सुलतान या शिक्षकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व संचालन कु. पलक तायडे व कु. भाग्यश्री बनकर वर्ग ७ वा यांनी करून आभार प्रदर्शन कु. दिशा पवार वर्ग ८ वा या विद्यार्थिनींनी केले.

# कोणी पगार करता का पगार ?

## चार चार महिने पगार नाही. जगावं कसं - पाणी पुरवठा व स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यां पुढे प्रश्न

✦ कैलास राऊत



**• पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील जिल्हास्तरावरील कंत्राटी कर्मचारी चार - चार महिने पगार होत नसल्याने आता त्यांच्यामधील संयम संपलेला आहे. आता त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होत आहे. तरी तात्काळ सदर कंत्राटी कर्मचारी यांचा नियमित पगार सुरू करण्यासाठी सरकारकडे वारंवार मागणी करत आहे. यावर शासनाची काय भूमिका आहे याकडे त्यांचे लक्ष लागलेले आहे.**

**बुलढाणा :** ता. १३, जिल्हा परिषदेच्या पाणी आणि स्वच्छता विभाग सध्या अत्यंत बिकट स्थितीत वाटचाल करीत आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला निधी उपलब्ध नाही. याशिवाय चार महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन मिळाले नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी होत आहे. मागील कित्येक दिवसांपासून निधी मागणीसाठी शासन पातळीवर पाठपुरावा केला जात आहे. मात्र, त्याची दखल घेतली जात नसल्याची खंत या आर्थिक कोंडीमुळे उमटू लागली आहे. राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाला योजनासह, कार्यालयीन कामकाजासाठी तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. अशातच शासनाने एकतर निधीला कात्री लावली असल्याने या विभागाचा कारभार सध्या या स्थितीत विस्कळीत झाला आहे. प्रशासकीय खर्चाला एक रुपयाचा निधी उपलब्ध नसल्याने कार्यालयीन कामकाज व दैनंदिन गरजांवर विपरीत परिणाम जाणवत आहे. एवढेच काय तर पाणी पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांच्या कामाचे कोट्यवधी रुपयांचे देयके तीन वर्षांपासून थकीत आहेत. सोबतच शासकीय कार्यालयातील वीज देयकेही थकीत आहेत. परिणामी वीज पुरवठा खंडित होण्याची वेळ येऊन ठेपली होती. या विभागावर सध्या आर्थिक थकबाकीचे ओझे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सोबतच या विभागामध्ये तब्बल चार महिन्यांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत असल्याने या कर्मचाऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला आहे. या प्रकारामुळे ग्रामीण पाणी पुरवठा व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी आर्थिकदृष्ट्या हतबल झाले आहेत. विशेष म्हणजे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील आर्थिक निधी मागणीबाबत शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर मात्र या पत्राची दखल घेतली जात नसल्याची खंत व्यक्त होत आहे. त्यामुळे ही आर्थिक कोंडी केव्हा दूर होणार हा खरा प्रश्न आहे.

## फलोत्पादन क्षेत्रासाठी केंद्र-राज्य समन्वयातून ठोस निर्णय; मातृतीर्थ सिं.राजाचा सन्मान

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ शिवाजी वायाळ



**सिंदखेड राजा :** फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली भारताचे कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची विशेष कार्य अधिकारी डॉ. दत्तात्रय भिसे व स्वीय सहायक सचिन अंबादास काटे यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत राज्यातील फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणी व त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान फळबाग शेतकऱ्यांना अधिक अनुदान देणे, केंद्र शासनाच्या विविध योजनांतून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देणे, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून फलोत्पादन वाढविण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी ठोस निर्णय घेतले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे, मातृतीर्थ सिंदखेड राजा तालुक्यातील स्वीय सहायक सचिन अंबादास काटे हे आपल्या कार्यक्षेत्रात अत्यंत उत्कृष्ट व जबाबदारीने काम करत असून त्यांच्या या योगदानामुळे मातृतीर्थ नगरीच्या मानात भर पडत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या माध्यमातून स्थानिक भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना केंद्रस्तरावर प्रभावीपणे मांडणी होत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असून, भविष्यात फलोत्पादन क्षेत्रासाठी अधिक भक्कम व दीर्घकालीन धोरण राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.